33

# महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

ता. राहुरी, जि. अहमदनगर, पिन-४१३७२२

जा.क्र. मफुकृवि/लेखा शाखा-२/ 396 /२०१८ दिनांक : 22/03/2018

## परिपत्रक

**विषय- राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचा-यांना मंजूर करण्यात येणा-या महागाई भत्याच्या दरात दि. १ जूलै, २०१७ पासून सुधारणा करण्याबाबत.**

**संदर्भ-** शासन निर्णय क्रमांक: मभवा-२०१७/प्र.क्र.११/ सेवा-९/ दि. २८ फेब्रुवारी २०१८

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांच्या अधिनस्त कार्यरत सर्व आहरण व संवितरण अधिकारी, योजना प्रमुख यांना या परिपत्रकान्वये कळविण्यात येते की, शासन निर्णय क्रमांक : मभवा-२०१७/प्र.क्र.११/ सेवा-९/ दि. २८ फेब्रुवारी २०१८ अन्वये राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचा-यांच्या महागाई भत्यामध्ये दि. १ जूलै २०१७ पासुन ६ व्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनसंरचनेतील मूळ वेतनावरील (वेतनबँड मधील वेतन अधिक ग्रेड वेतन) अनुज्ञेय महागाई भत्याच्या दर १३६% वरुन १३९% वाढ करण्यात आली आहे. दि. १ फेब्रुवारी, २०१८ पासून सदर महागाई भत्ता वाढ रोखीने देण्यात यावी. दि. १ जूलै २०१७ ते दि.३१ जानेवारी,२०१८ या ७ महिन्यांच्या कालावधीतील थकबाकीबाबत स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्यात येतील.

१. महागाई भत्याची रक्कम प्रदान करण्यासंदर्भातील विद्यमान तरतूदी व कार्यपध्दती आहे, त्याचप्रकारे यापुढे लागू राहील.

२. यावर होणारा खर्च संबंधित शासकिय कर्मचा-यांचे वेतन व भत्ते ज्या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात येतात, त्या लेखशीर्षाखाली खर्ची टाकून त्याखालील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा सांकेतांक २०१८०२२८१३०३१३९६०५ असा आहे.

नियंत्रक
म.फु.कृ.वि., राहुरी

प्रत- माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी समादराने अग्रेषित..

१. संचालक, कृषि शिक्षण, संशोधन व विस्तार शिक्षण, मफुकृवि, राहुरी
२. सहयोगी अधिष्ठाता शिक्षण व संशोधन (सर्व), विभाग प्रमुख (सर्व)
३. विद्यापीठ ग्रंथपाल, सुरक्षा अधिकारी, विद्यार्थी कल्याण अधिकारी,विद्यापीठ अभियंता.
४. उप-कुलसचिव (प्रशासन/विद्या), सहा.नियंत्रक/सहा. कुलसचिव (सर्व)
५. अधिदान व लेखा अधिकारी, पुणे/धुळे/कोल्हापुर/राहुरी/ अति. अधिदान व लेखा अधिकारी, मफुकृवि, राहुरी
६. शाखा प्रमुख/प्रभारी अधिकारी/योजना प्रमुख (सर्व)
७. प्राचार्य, कृषि तंत्र विद्यालये (सर्व), कृषि तंत्र विद्यालय, मालेगाव
८. मा. कुलगुरु,कुलसचिव यांचे स्वीय सहाय्यक मफुकृवि, राहुरी